# BDP / BCA / BTS

## मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम

## सत्रांत परीक्षा

01585

## दिसम्बर, 2017

## पाठ्यक्रम कोड : एफ.एम.टी.-01

*वेळ : दोन तास* *अधिकतम गुण : 50*

***सूचना : सर्व** प्रश्न सोडवणे आवश्यक आहेत.*

1. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर निबंध लिहा : *10*

   (a) आपली सामाजिक कर्तव्ये

   (b) माझा आवडता लेखक

   (c) मला आवडणारा सण

   (d) स्त्रियांचा सन्मान म्हणजे समाजाची सांस्कृतिक उन्नती

2. खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा : *8*

   (a) संत तुकारामांनी संतांच्या जीवनाचा हेतू कोणता सांगितला आहे ?

   (b) कवीला किंवा कलावंताला जीवनातून वगळले तर काय होईल असे केशवसुत सांगतात ?

   (c) मर्ढेकरांच्या कवितेमुळे मराठी कवितेत कोणकोणते परिवर्तन घडले ?

   (d) जुनीकथा आणि नवकथा यांतील फरक स्पष्ट करा.

3. खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे लिहा : 6

(a) 'वळीव' या शंकर पाटील यांच्या कथेत 'निसर्ग' हे एक महत्त्वाचे पात्र कसे आहे, ते विशद करा.

(b) 'चेलमा' या आत्मकथनात्मक उताऱ्यातून व्यक्त झालेला एका दलित व्यक्तीचा अनुभव, हा सर्व दलित समाजाचाच कसा आहे, ते सांगा.

(c) 'आकाश' या ललित निबंधातून शिरवाडकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन कसे होते, ते स्पष्ट करा.

(d) कुंजाला सांबर मारणे का मान्य नाही ?

4. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर टीपा लिहा : 6

(a) 'गुंड्याभाऊचे दुखणे' या कथेतील विनोदाचे स्वरूप

(b) डॉ. आंबेडकरांच्या मते लोकशाहीच्या रक्षणासाठी आपल्यावर असलेल्या जबाबदाऱ्या

(c) बालगंधर्वांच्या यशाचे रहस्य

(d) लोकशाहीत नागरिकाला लाभणारे महत्त्वाचे अधिकार

5. शब्दांच्या आठ जाती सांगून 'विशेषण' आणि 'क्रियाविशेषण' यांचे प्रत्येकी एक-एक उदाहरण वाक्यात उपयोग करून सांगा. 5

**किंवा**

खालीलपैकी ***एका*** कल्पनेचा सुमारे सहा ते आठ ओळींत विस्तार करा :

(a) उद्योगाचे घरी ऋद्धिसिद्धि पाणी भरी

(b) एकमेकां साह्य करू, अवघे धरू सुपंथ

(c) गरज सरो वैद्य मरो

6. खालीलपैकी कोणत्याही *तीन* वाक्प्रचारांचा अर्थ सांगा : 3

(a) कोंड्याचा मांडा करणे

(b) नाकी नऊ येणे

(c) खडे चारणे

(d) सतीचे वाण

(e) हात आभाळाला पोचणे

किंवा

खालीलपैकी कोणत्याही *तीन* म्हणींचा अर्थ स्पष्ट करा :

(a) ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी

(b) गाव करी ते राव न करी

(c) मऊ सापडले म्हणून कोपराने खणू नये

(d) वळचणीचे पाणी आढ्याला जात नाही

(e) काही गुण सोन्याचा काही सोनाराचा

7. खालीलपैकी कोणत्याही *एका* प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा : 4

(a) भाऊराव पाटील यांचे शिक्षणविषयक कार्य.

(b) स्त्रीबद्दल समाजाचा पारंपरिक आणि आधुनिक दृष्टिकोण यांतील भेद कोणता ?

(c) लोकसंख्यावाढ रोखण्यासाठी कोणते उपाय केले पाहिजेत ?

(d) पर्यावरणाचे संरक्षण कसे करावे ?

8. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : *4*

Galileo began to practise medicine in his leisure moments. But his leisure moments were few. For he was busier than ever with his experiments. It was his purpose, he said, to re-examine the scientific doctrines of Aristotle instead of accepting them as gospel truth. The way to arrive at a scientific truth, he maintained, was not to memorize the books of Aristotle, but to study the book of Nature.

9. खालील उताऱ्याचा सारांश लिहा : *4*

मनुष्याला प्राप्त असलेली पहिली शक्ती म्हणजे 'विचार करण्याची कला' ! इतर प्राण्यांकडे ही शक्ती नसते. मनुष्याजवळ मात्र विचार करण्याची क्षमता आहे. शिवाय भाषेच्या माध्यमातून विचार व्यक्त करण्याची नैसर्गिक देणगीही त्याला लाभली आहे. ज्याप्रमाणे आपण काहीही न करता आपला श्वास सुरू असतो, अगदी त्याचप्रमाणे आपण काहीच केलं नाही, तरीही मनात विचार सुरूच असतात. तथापि त्या विचारांना योग्य दिशा देणं ही 'विचार-नियमना'ची आद्य आवश्यकता आहे. विचारांना आपण जर योग्य दिशा दिली नाही, तर ते कसेही भरकटत जातात. त्यासाठी नकारात्मक गोष्टी मनातून काढून टाकून आपले लक्ष सकारात्मक गोष्टींवर केंद्रित केले पाहिजे. त्यासाठी सकारात्मक शब्दांचा वापर करून मनाला आदेश देण्याची सवय लावून घेतली पाहिजे. त्यामुळे जीवन आनंदी बनेल.

---